MHAK060024632021

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०९/०८/२०२१ |
| नोंदणी तारीख | : | ०९/०८/२०२१ |
| निकाल तारीख | : | २९/०५/२०२६ |
| कालावधी | : | वर्षे ०४ महिने ०९ दिवस २० |

**भाग 'अ'**
**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पृष्ठ)**
**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **...निशाणी क्र. ३८...** |
| **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग [न्यायालय क्र.२] अकोट यांच्या न्यायालयात** (पिठासीन अधिकारी,श्री. ए. ए. माळी) | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **६८८/२०२१**<br>**अकोट शहर,** पोलीस ठाणे जि. अकोला. |
| न्यायनिर्णयाची तारीख | **२९/०५/२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **नि. फौजदारी खटला क्र. २०४/२०२१**<br>CNR.No. **MHAK060024632021** |
| तक्रारकर्ता/ अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासनतर्फे,**<br>मार्फत/द्वारा पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस स्टेशन अकोट शहर,<br>जि. अकोला. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्रीमती. पी. एल. हरणे,**<br>(सरकार पक्षातर्फे विधीज्ञ) |
| आरोपी | *१) गोविंदराम तिरथदास हिराणी (मयत),*<br>**२) दिनेश गोविंदराम हिराणी,**<br>वय– ३७ वर्षे, व्यवसाय– व्यापार<br>**३) संतोष गोविंदराम हिराणी,**<br>वय– ३५ वर्षे, व्यवसाय– व्यापार<br>आरोपी क्र. २ व ३ रा. सिंधी कॅम्प,<br>अकोट, ता. अकोट, जि.अकोला.<br>**४) आकाश उर्फ गोपाल गजानन कव्हाळे,**<br>वय– २६ वर्षे, व्यवसाय– मजुरी<br>रा. इंदिरा नगर, रेल्वे स्टेशन जवळ,<br>अकोट, ता. अकोट, जि.अकोला. |

| | |
|---|---|
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **ॲड. श्री. एफ. ए. काझी**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग 'ब'**
**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०८/०७/२०२१ |
| पहिल्या खबरीची तारीख | ०८/०७/२०२१ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०५/०८/२०२१ |
| दोषारोपनिश्चतीची तारीख | १७/११/२०२५ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | २८/०१/२०२६ |
| न्यायनिर्णयाची नेमलेली तारीख | २२/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २२/०५/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | लागु नाही |

## आरोपीबाबत तपशील

| आ क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४. | *गोविंदराम तिरथदास हिराणी (मयत)*<br>**दिनेश गोविंदराम हिराणी**<br>**संतोष गोविंदराम हिराणी**<br>**आकाश उर्फ गोपाल गजानन कव्हाळे** | समजपत्रावर सोडले | १७/११/ २०२५ | भारतीय दंड विधान १८६० च्या कलम २९४, ३२३, ५०६ सह कलम ३४ नुसार. | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. | -- | -- |

| **या न्यानिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | फौ.प्र.सं, १९७३ |
| भारतीय दंड विधान, १८६० | भा.दं.वि, १८६० |
| भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ | भा. पु. अ, १८७२ |

## न्यायनिर्णय
## (दिनांक : २९/०५/२०२६ रोजी खुल्या न्यायदालनात अधिघोषीत)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम (संक्षिप्तरित्या "भा.दं.वि.") २९४, ३२३, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप असल्याने संपरिक्षीत करण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे की, फिर्यादी दिलीप कन्हैयालाल जेस्वाणी व आरोपी हे सिंधी कॅम्प अकोट येथे शेजारी शेजारी राहतात. दिनांक ०८/०७/२०२१ रोजी दुपारी ०३-०० ते ०४-०० वाजेच्या दरम्यान जोरदार पाउस झाल्याने ०३-४५ वाजेच्या सुमारास फिर्यादीच्या घरात पावसाचे पाणी घुसले. फिर्यादीने बाहेर येवून पाहिले असता आरोपी क्र. ३ व ४ हे फावडयाने मातीचा ढिग करून पावसाचे पाणी फिर्यादीच्या घराकडे वळवित होते. फिर्यादीने त्यांना हटकले असता आरोपींनी फिर्यादीला हरामखोर, मादरचोद, भोसडीके, जो तेरे से क्या होता कर ले अशी अश्लील शिवीगाळ केली. सदर वेळी आरोपी क्र. १ व २ देखील तेथे आले व आरोपी क्र. २ ने फिर्यादीचा मुलगा नवीन यास गच्ची धरून त्याला झापडा मारल्या. आरोपी क्र. ३ हा त्याचे हातातील फावडा घेवुन फिर्यादीच्या अंगावर धावून आला असता फिर्यादीची पत्नी व आई यांनी सोडवासोडव करण्याचा प्रयत्न केला असता आरोपी क्र. २ ने फिर्यादीची पत्नी व आई यांना देखील लोटलाट व अश्लील शिवीगाळ केली. फिर्यादीने घाबरून घराचा दरवाजा बंद करून घेतला तरी देखील आरोपी हे फिर्यादीच्या दारासमोर उभे राहून फिर्यादीस बाहर निकल आज तुझे खलास कर देंगे, आज तेरा किस्सा खतम कर देंगे असे म्हणून जिवे मारण्याच्या धमक्या देत होते. त्यामुळे फिर्यादीने अकोट शहर पोलीस ठाणे येथे धाव घेवून पोलिसांना घटनेची सविस्तर लेखी माहिती दिली.

३. सदर माहितीच्या आधारे ठाणे अंमलदार, अकोट शहर पोलीस ठाणे याने आरोपींविरूध्द भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम २९४, ३२३,

५०६ सह कलम ३४ अन्वये अपराधांसाठी गुन्हा क्र. ६८८/२०२१ नोंदवला. तपासाचे काम पो.हे.कॉ हिम्मत दंदी, ब. नं. १५४० याचेकडे सोपवण्यात आले. तपास अधिकारी याने तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा तयार केला, घटनेशी परिचीत साक्षीदारांचे जबाब नोंदविले, आवश्यक कागदपत्रे गोळा केलीत व तपासाअंती आरोपींनी वरप्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपींविरुध्द प्रस्तुत दोषारोपपत्र दाखल केले.

४. मी संचिकेचे अवलोकन करून आरोपींविरुध्द नि.क्र.१७ नुसार भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम २९४, ३२३, ५०६ सह कलम ३४ अन्वये अपराधांसाठी दोषारोपाची मांडणी केली. सदर दोषारोपातील मजकुर आरोपींना मातृभाषेतुन वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपींनी त्यांच्यावर लावलेले आरोप नाकारून खटला चालवण्याची विनंती केली. अभिलेखावरील आरोपींविरूध्द आलेला विपरीत पुरावा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपींची निवेदने (निशाणी ३५ ते ३७) नोंदवुन त्यांना वाचुन व समजावुन सांगण्यात आला. आरोपींचा बचाव हा नकारात्मक असुन त्यांचेवर खोटी केस करण्यात आली असा आहे.

५. प्रस्तुत खटला न्यायनिर्णयीत करण्यासाठी खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थितीत होत असुन त्यावरील माझे निष्कर्ष सुसंगत कारणमिमांसेसह मी पुढीलप्रमाणे स्पष्ट करीत आहे ;

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | आरोपींनी संगनमताने फिर्यादी दिलीप कन्हैयालाल जेस्वानी यास सार्वजनिक ठिकाणी अश्लील शिवीगाळ करून फिर्यादीस त्रास दिला व त्यान्वये आरोपींनी भा.दं.वि कलम २९४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही... |

| | | |
|---|---|---|
| २) | आरोपी यांनी संगनमताने फिर्यादीची पत्नी हेमा, आई द्रोपदीबाई व मुलगा नवीन यांना चापट–बुक्क्यांनी मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली व त्यान्वये आरोपींनी भा.दं.वि कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ३) | आरोपींनी संगनमताने फिर्यादीस फौजदारीपात्र धाकदपटशा केली व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि. चे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये दंडनीय अपराध केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ४) | काय आदेश ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

– **<u>का र ण मि मां सा</u>** –

६. अभियोगपक्षाने आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी न्यायनिर्णयाचे परिशिष्ट 'क' यात नमुद साक्षीदारांची साक्ष नोंदवुन त्यावर भिस्त ठेवली आहे.

*<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता</u>*–

७. प्रस्तुत सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे न्यायनिर्णयाची अतिविस्तृतता टाळण्यासाठी मी ते एकत्रितपणे चर्चेसाठी घेत आहे. अभियोग पक्षाच्या खटल्यानुसार आरोपी यांनी फावडयाने मातीचा ढिग करून पावसाचे पाणी फिर्यादीच्या घराकडे वळवले म्हणुन फिर्यादीने त्यांना हटकले असता आरोपींनी फिर्यादीला अश्लील शिवीगाळ व फौजदारीपात्र दमदाटी केली. तसेच फिर्यादीचा मुलगा नवीन यास झापडा मारून फिर्यादीची पत्नी व आई यांना लोटलाट केली असा आरोपींवर दोषारोप आहे.

८. या अनुषंगाने फिर्यादी दिलीप (अ.सा.क्र.१) याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्याने सर्व आरोपींना ओळखले. चार वर्षांपुर्वी दुपारी तीन ते चार वाजेच्या सुमारास घराबाहेर आरोपींसोबत पावसाचे पाणी आल्यामुळे बोलाचाल झाली होती व त्यारून आपण रागाचे भरात आरोपींविरूध्द पोलिसा फिर्याद दिली असा फिर्यादीने शपथेवर तोंडी पुरावा दिलेला आहे. फिर्यादीने फिर्याद व प्रथम खबर अहवालावरील आपल्या सह्या ओळखल्या परंतु त्यातील मजकुर मात्र स्पष्टपणे नाकारला आहे. सबब, अभियोग पक्षाकडुन फिर्याद व प्रथम खबर अहवाल संशयापलिकडे शाबित झालेला नाही.

९. हेमा (अ.सा.क्र.२) व नविन (अ.सा.क्र.४) हे घटनेचा प्रत्यक्षदर्शी तथा व्यथित साक्षीदार असुन कमल (अ.सा.क्र.३) हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. हेमा (अ.सा.क्र.२) हिने आरोपींविरूध्द बोलाचाली व्यतिरिक्त अन्य कोणताही घटना घडली नाही व पोलिसांनी आपल्याला विचारपुस करून आपले बयाण नोंदवले नाही असे शपथेवर कथन केले आहे. नविन (अ.सा.क्र.४) याने देखील घटनेवेळी तो बाहेर खेळायला गेलेला होता. त्याचे आईवडीलांना शिवीगाळ व त्याला गच्ची धरून झापड मारल्याची घटना घडली नाही असे शपथेवर कथन केले आहे. कमल (अ.सा.क्र.३) याने देखील त्याला घटनेबाबत काहीच माहित नाही व पोलिसांनी आपल्याला विचारपुस करून आपले बयाण नोंदवले नाही असे शपथेवर कथन केले आहे.

१०. प्राप्त परिस्थितीत सदर महत्त्वपूर्ण फिर्यादी तथा जखमी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी आपापल्या पुर्वीच्या जबाबांशी विसंगत कथने केल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार सदर सर्व साक्षीदांराना न्यायालयाच्या परवानगीने सुचक प्रश्न विचारले. परंतु, आरोपींना गुन्ह्यात गोवण्याइतपत कोणत्याही उपयुक्त अशा मान्य कथनाची अथवा विपरीत पुराव्याची नोंद अभिलेखावर त्यांच्या तोंडी पुराव्यातुन झालेली नाही. याउलट

सदर साक्षीदारांनी सुचक प्रश्नांदरम्यान आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपली तडजोड झाल्याची बाब मान्य केली आहे.

११. आरोपींतर्फे अभिलेखावर उपलब्ध घटनास्थळ पंचनामा (नि. ३०) व अटक पंचनामे (नि. ३१ ते ३४) मान्य करण्यात आले आहेत. उपलब्ध प्रत्यक्ष साक्षीदारांचा पुरावा पाहता अभियोग पक्षाचे इतर साक्षीदार तपासण्यात काहीच तथ्य उरत नाही. परिणामी, अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. याठिकाणी नमुद करणे गरजेचे आहे की, फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी यांचे प्रत्यक्ष पुराव्यांचे एकत्रितपणे अवलोकन केले असता आरोपींवरील दोषारोपच मुळात प्रत्यक्ष पुराव्याअभावी संशयापलीकडे शाबित होत नसल्यामुळे जरी आरोपींतर्फे घटनास्थळ पंचनामा (नि. ३०) व अटक पंचनामे (नि. ३१ ते ३४) मान्य करण्यात आलेले असले तरी त्यामुळे आरोपींवरील दोषारोप संशयापलिकडे शाबित होतो असे म्हणता येत नाही. सबब, अभिलेखावर उपलब्ध पुराव्यानिशी आरोपींवरील दोषारोप संशयापलिकडे शाबित झालेला नाही. म्हणुन मी मुद्दा क्र. १ ते ३ साठी नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

***<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>*** –

१२. मुद्दा क्र. १ ते ३ वरील नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपींवरील दोषारोप संशयापलीकडे शाबित न झाल्याने आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. प्रस्तुत प्रकरणी कोणताही मुददेमाल जप्त नाही. सर्व आरोपी जामीनावर मुक्त आहेत. सबब, मुद्दा क्र. ४ साठी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** सर्व आरोपींची भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २९४, ३२३, ५०६ अन्वये दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे वैयक्तिक जातमुचलके व जामिन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ नुसार प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चा वैयक्तिक जातमुचलका व तितक्याच रकमेचे जामिन बंधपत्रे सादर करावीत.

(*न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात अधिघोषीत केला*).

स्वा/–
(ए. ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(न्या.क्र.२) अकोट, जि. अकोला.

अकोट.
दिनांक : २९/०५/२०२६.

**भाग 'क'**
**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४ (३)]**
**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदांराची यादी**

**अ. अभियोग पक्ष**

| क्रमांक | नांव | पुराव्या प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | दिलीप कन्हैयालाल जेस्वानी (नि.क्र.२२) | फिर्यादी तथा जखमी साक्षीदार |
| सा.क्र.२ | हेमा दिलीप जेस्वानी (नि.क्र.२६) | प्रत्यक्षदर्शी तथा जखमी साक्षीदार |
| सा.क्र.२ | कमल अनिलकुमार जेस्वानी (नि.क्र.२७) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| सा.क्र.२ | नविन दिलीप जेस्वानी (नि.क्र.२९) | प्रत्यक्षदर्शी तथा जखमी साक्षीदार |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी**

**ब. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३० | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ३१ ते ३४ | आरोपींचे अटक पंचनामे |

**क. महत्त्वाच्या वस्तु**

| अ.क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| .. | निरंक | निरंक |